**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
जा.क्र.:मका/कार्यक्रम/२०१५-२०१६/92-60 दिनांक : 29-8-2015

**परिपत्रक**

विषय :- **बाल नाट्य महोत्सव – २०१५-१६**

मंडळाच्या वतीने कामगार कुटूंबियातील मुला-मुलींमधील कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्यातील कलागुण हेरुन त्यांना योग्य वेळी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे या दृष्टीने मंडळाच्या वतीने बाल नाट्य महोत्सवाचे आयोजन गट स्तरावर करण्यात येते.

मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे सन २०१५-१६ या वर्षी सुद्धा माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये सर्व गट स्तरावर बाल नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात यावे.

बाल नाट्य महोत्सवाच्या नियम व अटी पुढील प्रमाणे राहतील

१) नाटकात भाग घेणारे ५० टक्के बाल कलाकार मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कक्षेत येणारे कामगार / कर्मचारी यांचे कुटूंबिय असले पाहिजे.
२) प्रत्यक्ष बाल नाटकात भूमिका करणाऱ्या बाल कलाकारांचे वय १५ वर्षापर्यंतच असावे.
३) नाट्य स्पर्धेच्या आयोजनाकरिता कमीत कमी ८ नाट्य संघानी भाग घेणे आवश्यक राहिल.
४) केंद्राच्या नाट्य संघाचे कलाकार हे केंद्राचे सर्वसाधारण सभासद असलेच पाहिजे.
५) केंद्राच्या नाट्य संघातील जास्तीत जास्त १५ कलाकारांना ( मदतनीसांसह ) स्पर्धेच्या स्थळापर्यंत कमीत कमी दराचा जाण्यायेण्याचा प्रवास खर्च देण्यात येईल.
६) नाटक हे कमीत कमी ३० मिनिटे व जास्तीत जास्त ४५ मिनिटांचे असावे
७) नाट्य महोत्सवांत भाग घेऊ इच्छिणाऱ्या नाट्य संघांनी आपल्या प्रवेश अर्जासोबत नाट्य स्पर्धेत सादर करावयाच्या नाट्य संहितेच्या दोन सुवाच्य अक्षरातील प्रती पाठविणे आवश्यक आहे.
८) नाट्य महोत्सवांत सादर करण्यात येणाऱ्या नाटकाच्या लेखकाची परवानगी पत्रांची साक्षांकित प्रत जोडावी.
९) सर्व नाट्य संघांनी नाटकातील पात्रांची संपुर्ण नावे, ते कामगार कुटूंबिय असल्याबाबतचा दाखला तसेच भूमिकांची खुलासेवार यादी व वयाचा दाखला प्रवेशिका सोबत द्यावा लागेल.
१०) नाट्य महोत्सवाकरिता महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ ३ परिक्षकांची नियुक्ती करील.
११) कोणतेही कारण न देता आपल्या अधिकारात मंडळ एखाद्या नाट्य संघास / संस्थेस प्रवेश नाकारु शकेल. नकाराचे कारण देण्याचे बंधन मंडळावर राहणार नाही.
१२) नाट्य महोत्सवाच्या परिक्षणाकरीता रंगमंचावरील दर्शनी व मागील पडदा, सर्वसाधारण विजेचे दिवे व ध्वनीक्षेपणाची व्यवस्था मंडळाकडून करण्यात येईल.
१३) नाट्य महोत्सवातील केंद्राच्या संघाना सादरीकरण खर्चासाठी रु.१०००/- देण्यात येतील.

नाट्य महोत्सवातील विजेत्या संघाना व कलावंतांना खालीलप्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

| क्र. | तपशिल | मंजुर रक्कम | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम | व्दितीय | तृतीय |
| १ | नाट्य संघ बक्षिस | १००० | ७५० | ५०० |
| २ | अभिनय मुले बक्षिस | ४०० | ३०० | २०० |
| ३ | अभिनय मुली बक्षिस | ४०० | ३०० | २०० |
| ४ | दिग्दर्शन | ५०० | ३०० | २०० |

वरील प्रमाणे नियम व अटींची अंमलबजावणी करुन गट प्रमुखांनी बाल नाट्य महोत्सवाचे आयोजन करावे. विभाग प्रमुखांनी सदर परिपत्रकाच्या अंमलबजावणी बाबत योग्य ती कार्यवाही करावी. सदरचे परिपत्रक चालु आर्थिक वर्षापासून पुढील आदेश निघेपर्यंत अंमलात राहिल.

कल्याण आयुक्त

प्रत,

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
२) सहायक कल्याण आयुक्त, कार्यक्रम मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
३) प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
४) सहायक कल्याण आयुक्त, विभागिय कार्यालय, ठाणे/मुंबई/नागपूर/नाशिक/पूणे/ कामगार क्रीडा भवन, मुंबई
५) प्रभारी सहायक कल्याण आयुक्त, विभागिय कार्यालय, अकोला / औरंगाबाद
६) सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागिय कार्यालये.
७) कामगार विकास अधिकारी, का.क.भवन, नागपूर / पुणे
८) कामगार कल्याण अधिकारी (१८ गट कार्यालये).★★★
९) सर्व केंद्र प्रमुख

★★★ यांनी सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.